**निमित्ताने**

# नवसंजीवनीची गरज

विद्युत भागवत

प्रफुल्ल बिडवई यांच्या मुळातील इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे पुण्यात नुकतेच प्रकाशन झाले. मिलिंद चंपानेरकरांनी हा अनुवाद केला आणि रोहन प्रकाशनाने तो ग्रंथ प्रकाशित केला.

५ ऑक्टोबर २०१८ रोजी सायंकाळी या प्रकाशन समारंभाला उपस्थित राहिले, तिथे हा ग्रंथ मिळाला. लगोलग तो वाचून काढला, आणि मग त्या निमित्ताने काही विचार मांडावेसे वाटले.

गेली १५ वर्षे परिसर या संस्थेच्या निमित्ताने प्रफुल बिडवई यांच्याशी परिचय आणि मैत्री होती. 'परिसर' या संस्थेने, भारतातील अण्वस्त्र उत्पादनासंदर्भात बिडवई यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यानंतरच्या काळात जेव्हा जेव्हा प्रफुल पुण्यात येई तेव्हा तेव्हा आम्हाला भेटत असे. खूप मोकळ्या गप्पा होत असत आणि त्या गप्पांमधून नव्या विचाराची दिशा कशी असावी हेही जाणवत असे. १९९०नंतरच्या नवउदारमतवादी धोरणाबद्दल किंवा वाढत्या सांप्रदायिकतेबद्दल चर्चा करताना प्रफुल अतिशय मोकळेपणाने स्वत:ची मते सांगत असे. सामाजिक, राजकीय क्षेत्रात आपण सर्वांनी कोणते पर्याय घेतले पाहिजेत याविषयी आम्ही बोलत असू. डाव्या विचारसरणीचा पठडीबद्ध स्वीकार न केलेला प्रफुल आम्हाला भेटला की, नवे काही सापडले असे वाटत असे. मुख्य म्हणजे इतके अफाट वाचन, अभ्यास असणारा हा माणूस आम्ही करत असलेल्या कामांबद्दल आस्था बाळगून उत्तेजन देत उत्साहाने मैत्रीच्या पातळीवर चर्चा करत असे. परंतु, एका मुक्तीदायी अशा संवादाची घडी अचानकच २३ जून २०१५ साली प्रफुलच्या जाण्याने विस्कटली.

प्रफुल बिडवईंचा 'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' घेणारा सदर ग्रंथ महत्त्वाचाच आहे परंतु, एकूणच डावी चळवळ कशी उदयाला आली, पश्चिम बंगालमध्ये कशी सत्तारूढ झाली आणि तेथे अरिष्ट कसे आले याचे नेमके चित्रण या ग्रंथात येते. प. बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या तीन राज्यांमध्ये सत्ता मिळविणे आणि गमावणे याबद्दल इतक्या खुलेपणाने, चिकित्सक दृष्टीने मांडणी करणारा हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे.

डाव्यांची शक्तीस्थाने विशद करताना लेखकाने साक्षरता प्रसार, वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यासाठी उत्तेजन देणे, लोकविज्ञानाचा प्रसार करणे, सांस्कृतिक क्षेत्रात लोकांना समाजाभिमुख करणे, सर्जनशील आविष्कार पाहण्यासाठी प्रोत्साहन देणे, अंधश्रद्धांचा विरोध करणे अशा कार्यात डाव्यांचे मोठे योगदान आहे असे नमूद

लेखिका पुणेस्थित स्त्रीप्रश्नाच्या अभ्यासक आहेत.
ईमेल– vidyutbhagwat@gmail.com

केले आहे. विज्ञान जनांच्या पातळीवर गेले पाहिजे यासाठी प्रयत्न करणारे डावे खरोखर देवधर्म निष्ठा आणि अंधश्रद्धा या विरोधात उभे राहिले हे लेखकाने नमूद केले आहे. असे सर्व असूनही महाराष्ट्रातला आपला अनुभव सांगतो की, अशा कोणत्याही चळवळींमध्ये त्या त्या कुटुंबाचे वर्चस्व किंवा समाजवादी अथवा मार्क्सवादी अशा शिक्क्याखाली शेवटी त्या त्या जातींचे गणगोत उभे राहिले आणि त्यांची त्यांची कलापथके किंवा नेतृत्वे उभी राहिली, असे का घडले हा प्रश्न शिल्लक राहतोच.

आंतरराष्ट्रीय धोरणाची चिकित्सा करण्याची जी भूमिका डाव्यांनी बजावली त्यावरही बिडवई यांनी भर दिला आहे. कम्युनिस्ट पक्षानेच १९९८च्या पोखरण येथील अणू चाचणीचा निषेध केला आणि भारताने आणि पाकिस्तानने आपापले अण्वस्त्र कार्यक्रम मागे घ्यावेत अशी मागणी केली. भारतासारख्या देशाने अण्वस्त्र विरहित जगाचा कार्यक्रम हाती घ्यावा असा महत्त्वाचा प्रयत्न डाव्या गटातून झाला. परंतु पुन्हा प्रश्न शिल्लक राहतो तो असा की, हा विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत का पोहचला नाही. अगदी स्वत: बिडवईंनीसुद्धा इंग्रजीमध्ये लिहून आंतरराष्ट्रीय स्तरांवरील समित्यांमध्ये काम करताना जनसामान्यांपर्यंत हा विचार पोचविण्यासाठी काय केले?

बुद्धिनिष्ठा, नैतिक प्रतिष्ठा, सिद्धांताला कार्याची जोड आणि तळागाळात काम करण्याची निष्ठा असे सर्व असूनही, हळुहळू डावे नव्या सामाजिक चळवळी आणि नव्या पद्धतीच्या कृती यातून बाहेरच का फेकले गेले? विशेषत: बाबरी मशिद कोसळविल्यानंतर मुंबईत जो गदारोळ माजला तेव्हा मराठी भाषकांमधल्या कनिष्ठ स्तरावरील गटांनी हिंसेत आणि दंगलीत सहभाग घेतला हे कसे समजून घ्यायचे, यावर जेवढे विचारमंथन व्हायला हवे होते तसे झाले नाही. बिडवई यांनी डाव्यांच्या कमजोऱ्या आणि अधोगती मांडताना अतिशय खोलात जाऊन काही मांडणी केली आहे. डाव्या विचारांना उतरती कळा लागली याबद्दल स्पष्टपणाने मान्यता देऊन बिडवई म्हणतात की, अनेक निवडणुकांमध्ये पत्करावी लागलेली हार, तसेच भूसंपादना बाबतचे टॉप-डाऊन मॉडेल आणि त्यातून अभिजन वर्गाच्या हिताचाच पुरस्कार हे सर्व डाव्यांच्या मुळावर घाव घालणारे ठरले.

या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे आहे की, प्रकरण दोनपासून प्रकरण आठपर्यंत पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा या राज्यांमध्ये सत्ता मिळूनही कोणत्या अरिष्टांना डाव्यांना तोंड द्यावे लागले याबद्दल डाव्या चौकटीच्या आतून, पण बाहेर राहून त्यांनी विचार मांडले आहेत. अगदी साध्या सोप्या भाषेत बिडवाई सांगतात की, भाकपने साम्राज्यवादविरोध आणि भांडवलशाही विरोध यांच्यात मेळ न साधता कधी साम्राज्यवाद विरोधी कृती तर कधी भांडवलशाही विरोधी कृती अशी डळमळीत भूमिका घेतली. भाकपसारख्या महत्त्वाच्या पक्षाने जनांच्या पातळीवर राजकीय कार्य केले नाही आणि पुढे नेले नाही याबद्दलही बिडवई परखड भाषेत मांडणी करतात. त्यांच्या मांडणीतील तेलंगणाचा लढा आणि त्या लढ्यातील शौर्य आणि शोकांत याबद्दल वाचताना खिन्नता येते. बिडवईंच्या मते, स्वातंत्र्योत्तर काळात १९५०च्या आणि १९६०च्या दशकांमध्ये भारतीय कम्युनिस्टांनी भारतीय समाजाचे योग्य विश्लेषण केले होते असे म्हणता येत नाही. ते लिहितात, 'भारतीय समाजरचनेची वैशिष्टपूर्ण चौकट लक्षात घेतली गेली नाही (कम्युनिस्टांनी). वर्ग-जातींची वैशिष्ट्यं, लिंगभेद, आर्थिक गतिशीलता, सत्तारचना (पॉवर स्ट्रक्चर्स) आणि राज्यसंस्थेचं स्वभाव-स्वरूप (कॅरॅक्टर) या गोष्टी त्यांनी समजून घेतलेल्या नव्हत्या' (पृ.११०).

शेतकरी प्रश्न आणि शेतमालाचा भाव याबाबतही डाव्या चळवळीचे कुठे चुकले याचा उहापोह करताना बिडवई म्हणतात की, कम्युनिस्टांनी ज्या मानाने भूमिहीन शेतमजूरांना संघटित करण्याला प्राधान्य द्यायला हवे

होते तसे घडले नाही. मग त्यामुळे निवडणुक जिंकून सत्तेवर येणं साध्य होण्यासाठी मोठ्या शक्तींशी युती केली गेली. भूमिहीनांचे संघटन करण्याचा मुद्दाच वगळला गेला. विशेषत: स्वातंत्र्यानंतर जवळपास सर्व राज्यांमध्ये भूमिहीनांची संख्या सातत्याने वाढत गेली हे लक्षातच घेतले गेले नाही. बिडवई असे म्हणतात की, नंबुद्रीपादांनीसुद्धा केरळमध्ये श्रीमंत शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचाच पुरस्कार केला. असे असूनही त्या राज्यात काँग्रेस सोशलिस्ट पक्षाच्या माध्यमातून भाकपने ग्रामीण भूमिहीनांना संघटित करण्याचे काम केले. प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी श्रीमंत शेतकरी वर्गाशी तत्त्वशून्यतेने आणि संधीसाधूपणे ज्या तडजोडी केल्या त्या गरीब वर्गाच्या विरोधात गेल्या असे दिसते. आजवर कोणत्याही डाव्या दस्तऐवजात ह्याबद्दलची परखड टीका मांडली गेली नाही. खुद्द पश्चिम बंगालमध्येच जरी शेतमजूरांची स्वतंत्र युनियन असली तरी तिचे स्वरूप बाल्यावस्थेत आहे. बिडवई यांनी पश्चिम बंगालमधील १९९४च्या नवऔद्योगिक धोरणाचा उल्लेख करून खाजगी भांडवल गुंतवणुकीला सताड दरवाजे कसे उघडून दिले गेले ह्यावरही टिप्पणी केली आहे. गुंतवणुकदारांच्या शर्ती आणि अटी निष्क्रियपणे स्वीकारल्या गेल्याने भांडवलाचे व्यवस्थापन आणि तारतम्यहीन पुरस्कार ह्यातील सीमारेषाही पश्चिम बंगालमध्ये धूसर झाल्याचे बिडवई म्हणतात. आपल्या या म्हणण्यास आधार म्हणून ते सिंगूर आणि नंदिग्रामचे उदाहरण देतात.

या पुस्तकात ऋणनिर्देशामध्ये अनेकांचे उल्लेख आहेत. प्रफुल बिडवई म्हणतात, 'मला हे पुस्तक लिहिण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या आणि मदत करणाऱ्या अनेकांचा मी ऋणी आहे. त्यातील अनेकांनी विश्लेषण करून, अंतर्दृष्टी देऊन, नवनवीन कल्पना सुचवून, संदर्भ साहित्य व संपर्क पुरवून आणि इतर असंख्य प्रकारे मला साहाय्य केलं. त्यांत, स्वतंत्र मार्क्सवादी आणि समाजवादी विश्लेषक, डाव्या पक्षांचे नेते व कार्यकर्ते, ट्रेड युनियन्स-किसान सभा आदी चळवळींमधील नेते-कार्यकर्ते, बिगर-पक्षीय राजकीय गटांचे सदस्य, दलित, स्त्रीवादी, पर्यावणवादी व नागरी हक्क चळवळीतील कार्यकर्ते आदींचा समावेश आहे.' अनेक बैठका घेऊन, संवाद करून प्रफुल बिडवई हे पुस्तक सिद्ध करत होते. ज्यांच्याशी त्यांनी संवाद केला त्यांची यादी त्यांनी दिली आहे. त्यात सुमंता बॅनर्जी, के. एन. पण्णीकर यांच्यासह अनेक व्यक्तींचे उल्लेख आहेत. अशा व्यक्ती की ज्या गेली तीन दशके सातत्याने आपापल्या क्षेत्रात परिवर्तनाचा ध्यास घेऊन काम करत आहेत. बिडवईंचा हा खुलेपणा आणि मैत्रीच्या असंख्य, अमर्याद शक्यता जगण्याची ताकद या ग्रंथाला वेगळेपण देते.

डाव्या चळवळींचा मागोवा घेणारा हा ग्रंथ वाचकांनी मुळातूनच वाचला पाहिजे. ज्यांना मराठी अनुवादच फक्त वाचता येईल त्यांना काही ठिकाणी मराठीच्या दृष्टीने अर्थ लावणेही अवघड होईल. परंतु तरीही हा ग्रंथ वाचला गेला पाहिजे आणि त्यातून चर्चा आणि प्रश्न उभे राहिले पाहिजेत. कारण आताच्या घडीला पूर्ण सत्तांतर झाल्यावर आणि कमळ फुलल्यावर ज्या प्रकारची हिंसकता, अनिश्चितता आणि भयभीतता आपण अनुभवतो आहोत त्यातून निराश व्हायचे नसेल तर हा ग्रंथ वाचलाच पाहिजे.

महत्त्वाचा मुद्दा येथे मांडावासा वाटतो तो असा की, प्रफुल बिडवईंनी पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा या राज्यांमध्ये डाव्यांचे काय झाले, या विषयी सोदाहरण मांडले आहे. परंतु, महाराष्ट्रामध्ये 'लाल सलाम' करणारे, संघटित पक्षात काम करणारे आणि बिगर संसदीय रीतीने काम करणारे अनेक गट आहेत त्याबद्दल या ग्रंथात काहीच मांडणी येत नाही. किंवा तशी मांडणी आली तर लोकविज्ञानसारखे प्रयोग सर्वसामान्यांपर्यंत का पोहचले नाहीत याचे विश्लेषण येत नाही. गेली तीस वर्षे पुणे-मुंबई आणि अगदी नांदेड-औरंगाबाद अशा ठिकाणी सतत कार्यरत असणारी, डावा विचार

घेऊन काम करणारी माणसे आपल्या परिचयाची असल्याने प्रश्न पडतो की, रस्त्यावर उतरून मागणी करणारे हे गट केवळ सत्तारूढ नाहीत म्हणून बिडवईंकडून त्याविषयी काही लिहिले गेले नाही की बिडवईंना हे सर्व एकत्र करून लिहिण्यासाठी वेळच मिळाला नाही?

स्त्रीवादी विचार घेऊन स्त्रीप्रश्नाचे आकलन अभ्यासक म्हणून करताना मला स्वत:लासुद्धा जास्तीत जास्त संवाद करता येतो तो अशा डाव्या चौकटीत विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांशी. म्हणूनच इथे अगदी मोकळेपणाने असा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की, या प्रकाशनाच्या कार्यक्रमात जेव्हा अचिन वनायक किंवा कुमार केतकर अशा विचारवंतांनी बिडवई यांच्या स्त्रीवादाच्या आकलनासंदर्भात असणारी भूमिका अजिबातच अधोरेखित केली नाही, असे का घडते आहे? जातीचा प्रश्न आणि स्त्री प्रश्न याची गुंतागुंत आता परिवर्तनाच्या प्रयत्नामध्ये गाभ्यापाशी मांडली गेली पाहिजे. परंतु आजही खैरलांजी किंवा निर्भया अशा प्रकरणांचा डाव्या परिप्रेक्ष्यातून फारसा उहापोह होताना दिसत नाही. परिणामी अंधश्रद्धा निर्मूलनासारख्या एककलमी चळवळीमध्ये येणारी कुंठितता कशी सोडवायची अशा प्रश्नांचा विचार डाव्या परिप्रेक्ष्यातून खुलेपणाने होताना दिसत नाही. एकूणच धर्मवादी गटांचे टकराव आणि जातीजातींमधील तेढ आणि उसळता हिंसाचार– त्यात बळी जाणाऱ्या स्त्रिया किंवा त्या हिंसाचाराच्या वाहक असणाऱ्या स्त्रिया ह्या विषयी अधिकाधिक सर्जनशील विचार आला पाहिजे. म्हणजे हजारो दिशांनी विचारांची फुले जर फुलली तर मग कमळाला इतकी वर्चस्ववादी भूमिका घेताच येणार नाही. त्यासाठी स्त्रीवादी गटांना, जातीच्या प्रश्नावर लढणाऱ्यांना, तसेच शेतीच्या लहान लहान तुकड्यांच्या संरक्षणासाठी जिवापाड प्रयत्न करणाऱ्यांना उत्तेजन देण्याचे काम डाव्या परिप्रेक्ष्यातून झाले पाहिजे. सतत फक्त भांडवलशाहीची चिकित्सा, फॅसिझमचा उदय अशा भाषेत बोलत राहिले तर लोकांना दैनंदिन जीवनात जाणवणारी महागाई किंवा असुरक्षितता आणि त्यातून सुटण्यासाठी मृगजळासारखी दिसणारी आणि हवीहवीशी वाटणारी सुबत्ता ह्याकडे डाव्या परिप्रेक्ष्यातून आस्थेने बघितले गेले पाहिजे. हे पुस्तक वाचून अनेकांना अनेक दिशांनी नवीन विचार सुचतील आणि समाजात नवी घुसळण निर्माण होईल याबद्दल आशा ठेवायला काय हरकत आहे?

●

## चुकीची दुरुस्ती

१

दिवाळी अंकातील प्रजननविरोधाच्या नावानं या विभागातील उर्वशी बुटालियांच्या 'अपत्यहीन, नैसर्गिकपणे' या लेखाचा अनुवाद प्रा. राजक्रांती वलसे यांनी केलेला होता. तो अनवधानाने अभय कांता यांच्या नावाने देण्यात आला.

२

याच अंकातील 'दर्यातील हिरे' या जेम्स एने हेनशॉ लिखित एकांकिकेतील नायक ओकोरीच्या दुसऱ्या नातवाचे नाव ओणिमा नसून ओजिमा असे वाचावे.

चुकीबद्दल दिलगीर आहोत.

**संपादक**